• बीड (महाराष्ट्र) • वर्ष ३ रे • अंक ३१६ • शनिवार,दि.१७ फेब्रुवारी २०२४ • RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रूपये
• Beed (Maharashtra) • Year 3 • Issue 316 • Saturday 17 Feb 2024 • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • Page1 • Pages 4 • Price 3




दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
|बीड | परभणी | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

▪ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ▪




बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

# आरक्षणाचा कायदा केला तरच आंदोलन मागे -जरांगे पाटील






वडीगोद्री । वृत्तसेवा

**२० तारखेपर्यत सगेसोयरे कायद्याची अंमलबजावणी करा, हैद्राबाद गॅझेट स्वीकारा, शिंदे समितीची मुदत एक वर्ष वाढवा, आमच्यावर दाखल केलेले राज्यातील गुन्हे मागे घ्या, तरच आंदोलन थांबेल. अन्यथा २० तारखेपासून पुढे सरकारने सरकारचे बघावे, आम्ही आमचे बघू, असा गंभीर इशारा मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी (दि.१६) पत्रकार परिषदेत दिला.**

मागासवर्ग आयोगाने दिलेला अहवाल सरकारने स्वीकारला आहे. कुणबी नोंदी सापडलेल्यांना प्रमाणपत्र मिळणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे. ज्यांच्या नोंदी नाहीत, त्यांच्यासाठी कायद्यानुसार आरक्षण मिळणार, असेही मुख्यमंत्री म्हणाले. यावर बोलताना मनोज जरांगे म्हणाले की, ज्यांना जे आरक्षण घ्यायचे, त्यांनी ते आरक्षण घ्यावे, मात्र सगेसोयरे कायदा केला, तरच आंदोलन मागे घेऊ, अन्यथा नाही. अशी स्पष्ट भूमिका त्यांनी व्यक्त केली. कुणबी- मराठा असा भेद करणाऱ्या थोतांडाचे आता एकायचे नाही. कुठपर्यंत ९६ आणि ९२ कुळी राहता. गरिबांचे हाल होत आहेत. मागासवर्ग आयोग १०-१२ लोकांना हवा आहे. मागास प्रवर्ग आयोगाच्या अहवालावर टीका होत आहे. १५ दिवसांत सर्वेक्षण कसे झाले, त्यात दबाव आणला गेला. यावर बोलताना ते म्हणाले की, साडेचार लाख कर्मचाऱ्यांनी सर्वेक्षणाचे काम केले आहे. काल मागासवर्ग आयोगाचा अहवाल स्वीकारताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणीस उपस्थित होते. मात्र, दुसरे उपमुख्यमंत्री दिसले नाहीत. या प्रश्नावर ते म्हणाले की, त्यांना रेल्वे लागली नसेल. त्यांना माझा राग आला तर आला. मला काय फरक पडत नाही. केंद्रीय मंत्री नारायण राणे यांना यावेळी सुट्टी द्यायची आहे. निलेश राणे यांनी त्यांना समजावून सांगावे. आम्ही मराठ्यांच्या बाजूने बोललो, तुम्हाला आमच्याबद्दल स्वाभिमान असावा. त्यांना समजावून सांगा, अन्यथा त्यांना सोडणार नाही, त्यांचा पानउतारा करणार, त्यांना खेटायची माझी तयारी आहे, असे आवाहन त्यांनी राणेंना दिले.

## मराठा आंदोलनाला खांडेगाव पाटी येथे हिंसक वळण, बस पेटवली



परभणी । वृत्तसेवा

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी (दि. १६) जिल्ह्यात अनेक ठिकाणी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या दरम्यान, वसमत तालुक्यातील खांडेगाव पाटी येथे आंदोलनाला हिंसक वळण लागले. अज्ञात तरुणांनी बस पेटवून दिल्याची घटना घडली. ज्यामुळे वसमत आगाराचे सुमारे ४० लाखांचे नुकसान झाले. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी हिंगोली जिल्ह्यात आज रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. हिंगोली जिल्हयात २५ ठिकाणी आंदोलन झाले. हिंगोली ते परभणी, जिंतूर, वसमत ते नांदेड व परभणी, हिंगोली ते नांदेड या मार्गावर ठिकठिकाणी गावकर्यांनी आंदोलन केले. या आंदोलनामुळे हिंगोली, पुढील पानावर

## राज्यातील सरकार गोळीबार सरकार

मुंबई – महाराष्ट्रच्या आरोग्यमंत्र्याला निर्णय घेण्याचा अधिकार नाही, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले होते. छगन भुजबळ यांचं देखील कॅबिनेटमध्ये ऐकून घेतलं जातं नाही. त्यामुळे त्यांना मीडियात म्हणून त्यांना बोलावं लागतं. ते मागच्या आठवड्यात मला भेटले, त्यावेळी सांगत हो काय काय होतं आहे. मला आता सगळं सांगायचं नाही, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या. त्या मुंबईत बोलत होत्या. यावेळी त्यांनी सत्ताधारी पक्षावर टीकास्त्र सोडलं. पक्ष आणि चिन्ह आपल्याकडून हिसकावून घेतलं आहे.आपण कोर्टात गेलो आहोत. आता रडण्याचे दिवस गेले, आता लढण्याचे दिवस आले आहेत. माझ्याबाबत अनेक पुढील पानावर

## माजलगाव येथे जिनिंगला आग

माजलगाव : शहरा जवळ असलेल्या फुले पिंपळगाव येथील कुणाल कापूस जिनिंगला आग लागल्याने मोठे नुकसान झाले आहे. या आगीत १५ हजार क्विंटल कापूस जळून खाक झाला ही घटना दि.१६ दुपारी चारच्या सुमारास घडली. त्यानंतर माजलगाव अग्निशमक विभागाच्या कर्मचाऱ्यांनी आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. मात्र आग आटोक्यात आली नाही. त्यानंतर पाथरी, मानवत येथील अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. त्या नंतर आग आटोक्यात आली. माजलगाव शहराजवळ असलेल्या कुणाल कापूस जिनिंगला मशीन मध्ये झालेल्या स्पार्कने फायर होऊन आग लागली. या आगेने रौद्ररूप धारण केल्याने जिनिंग मध्ये असलेला जवळपास पंधरा हजार क्विंटल कापूस जळून खाक झाला. माजलगाव अग्निशमक दलाने तात्काळ घटनास्थळी धाव घेत आग विझविण्याचा प्रयत्न केला. मात्र आग आटोक्यात आणण्यासाठी अपयश आले. त्या नंतर बाजार समितीचे सचिव हरिभाऊ सोनवणे यांनी पाथरी मानवत येथील अग्निशमन दलाच्या गाड्याला पाचारण करून आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला.

## जरांगे पाटील यांना सकल मराठा समाज नेकनूरकरांचा पाठिंबा




नेकनूर - मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांना पाठिंबा म्हणून बसस्थानकासमोर राष्ट्रीय महामार्गावर शुक्रवारी (दि.१६) नेकनूर येथे मराठा समाजाच्या वतीने प्रशासनाला निवेदन देण्यात आले. यावेळी मनोज जरांगे पाटील 'तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है' अश्या घोषणा देखील देण्यात आले. मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील हे पुन्हा एकदा अंतरवली सराटी येथे उपोषणाला बसले असून आज त्यांच्या उपोषणाचा सातवा दिवस आहे. मनोज जरांगे पाटील यांना पाठिंबा म्हणून बसस्थानकासमोर राष्ट्रीय महामार्गावर शुक्रवारी (दि.१६) नेकनूरमध्ये मराठा समाजाच्या वतीने मागण्यांचे निवेदन प्रशासनाला देण्यात आले. यावेळी मनोज जरांगे पाटील 'तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है' अश्या घोषणा देखील देण्यात आल्या.

## शिवजयंती सामाजिक सलोखा राखत साजरी करा -एसपी नंदकुमार ठाकूर



बीड । प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज जयंती अनुषंगाने पोलीस ठाणे बीड शहर पोलिस ठाणे येथे संपुर्ण उपविभागाचे शांतता समितीची बैठक पार पडली. या बैठकी साठी सर्व शांतता समिती चे शहारातील सदस्य, शहारातील सर्व समाजाचे प्रतिष्ठित नागरिक, पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर उपविभागीय अधिकारी विश्वंभर गोलडे तसेच बीड उप विभागातील सर्व पोलीस स्टेशनचे ठाणेदार हे हजर होते.

या बैठकीमध्ये सर्व सदस्यांनी शिवजयंती अनुषंगाने समस्या मांडल्या आणि त्यावर काम करण्याचे आश्वासन पोलीस अधीक्षक यांनी दिले. पोलीस अधीक्षक श्री नंदकुमार ठाकूर यांनी निवेदन केले की, शहरात अठरा पगड जातीतील लोक सदैव एकत्र येतात आणि सर्व सण उत्सव उत्साहाने साजरे करतात, ही बाब बीड साठी अभिमानास्पद आहे. याही शिवजयंती कार्यक्रमात सामाजिक सलोखा राखण्याचे आवाहन मा. पोलीस अधीक्षक यानी केले.तसेच आगामी सण/उत्सव/ मिरवणुका यामध्ये ञा मूळे ध्वनी प्रदूषण होऊन आरोग्यविषयक धोका निर्माण होतो त्यामुळें ञा मुक्त पुढील पानावर




# मराठवाड्यात महाविद्यालय वाटपात अनियमितता

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी महाविद्यालय वाटप करत असताना मराठवाड्यात राष्ट्रवादी आमदारांच्या संस्थांना झुकते माप दिले. यामुळे भाजप समर्थक तसेच इमान इतबारे शिक्षण देऊ पाहणाऱ्या अनेक संस्थांवर अन्याय झाला आहे. विशेष म्हणजे विधी महाविद्यालय वाटप करत असताना न्याय देऊ पाहणाऱ्या संस्थांवरच अन्याय करत चंद्रकांत दादांनी मराठवाड्यात एका वेगळ्या शैक्षणिक वादाला तोंड फोडले आहे. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर येथे सर्वात जुनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आहे. त्या अंतर्गत यावर्षी नवीन अकरा महाविद्यालयांना परवानगी देण्यात आली आहे. त्यापैकी तीन विधी महाविद्यालय असून त्यातही राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदार असलेल्या संस्थांनाच परवानगी देण्यात आली आहे. इतर काही संस्थांनी नवीन विधी महाविद्यालयांचा प्रस्ताव दाखल केला होता. परंतु त्या सर्वांवर अन्याय करत त्यांना इरादा पत्र नाकारण्यात आले आहे. असाच काहीसा प्रकार स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत झाला आहे. या विद्यापीठ अंतर्गत असलेल्या ग्रामोदय सेवाभावी संस्था बाबुळगाव , तालुका वसमत, जिल्हा हिंगोली या संस्थेला तीन महाविद्यालय मंजूर करण्यात आले आहेत. त्यामध्ये एक वसुमती विधी महाविद्यालय , दुसरे कैलासवासी गोपाळराव पाटील ग्रामीण व्यवस्थापन महाविद्यालय व तिसरी राजे संभाजी व्यावसायिक व कौशल्य विकास वरिष्ठ महाविद्यालय मंजूर करण्यात आले आहेत. या संस्थेचे अध्यक्ष अजित पवार गटाचे आमदार चंद्रकांत उर्फ राजू नवघरे हे आहेत. तसेच परभणी जिल्ह्यातील जिंतूर येथील राष्ट्रवादीच्या आमदार मेघना बोर्डीकर यांच्याशी संबंधित असलेल्या कैलासवासी वामनराव कदम बोर्डीकर सेवा संस्था जिंतूर, जिल्हा परभणी यांना बोर्डीकर विधी महाविद्यालय सेलू ,जिल्हा परभणी येथे मंजूर करण्यात आले आहे. विशेष म्हणजे सेलू येथे दोन विधी महाविद्यालय मंजूर करण्यात आले असून दुसरे महाविद्यालय यशवंत शिक्षण प्रसारक मंडळ शास्त्रीनगर सेलूच्या यशवंत विधी महाविद्यालयाला मंजुरी देण्यात आली आहे. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्याकडे भावसार समाजाच्यावतीने महाराष्ट्रातील पुढील पानावर

संपादकीय

# आरक्षण

भारतात आरक्षण म्हणजे राखीव जागा हा कायमच संवेदनशील विषय राहिला आहे. महाराष्ट्रातही तो किती कळीचा बनला आहे, हे वेगळे सांगायला नको. कोणत्याही आरक्षणाच्या मुख्य कोट्याचे जातिसमूहातील अधिक मागास जातींना न्याय देण्यासाठी फेरवाटप करता येते का, हा घटनात्मक पेच सध्या सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठासमोर आहे. या प्रकरणाचा निकाल काय लागतो, यावर आरक्षणाचा पुढील प्रवास अवलंबून आहे. हा मुद्दा केंद्र सरकारपुरता मर्यादित नाही. विविध राज्यांमधील आरक्षणाची टक्केवारी तसेच वर्गवारी वेगळी आहे. उदाहरणार्थ, इतर मागास म्हणजे ओबीसींमध्ये समावेश असणाऱ्या अधिक मागास जातींना न्याय तसेच आरक्षणातील उचित वाटा मिळावा; यासाठी नवे कोष्टक किंवा टक्केवारीचे प्रमाण बनवावे लागेल. हा मुद्दा कधी ना कधी ऐरणीवर येणार होताच. याचे कारण, जातिव्यवस्थेच्या उतरंडीत आडवी म्हणजे हॉरिझॉण्टल समकक्षता जवळपास नाहीच. त्यामुळे, एकाच प्रवर्गात समाविष्ट असणाऱ्या शेकडो जातींमध्ये पुन्हा अंतर्गत उभी म्हणजे व्हर्टिकल उपरचना-उतरंड आहे. यामुळेच, आरक्षणाच्या धोरणात आणि मिळणाऱ्या सवलतींमध्ये तळागाळातल्या जाती तसेच जातिसमूहांच्या दृष्टीने मोठीच तफावत आणि गफलत राहून गेली आहे. न्याय देण्याच्या प्रक्रियेतील घोर अन्याय, हे या त्रुटीचे वर्णन वदतो व्याघात किंवा अंतर्विरोधी वाटले तरी ते खरे आहे. सामाजिक न्यायाच्या प्रक्रियेतील हा अन्याय दूर करण्याचा विचार मंडल आयोगाचा अहवाल व्ही. पी. सिंग सरकारने घाईघाईने स्वीकारला; तेव्हा व्हायला हवा होता. मात्र, तेव्हा सिंग यांच्यासाठी न्याय देण्यापेक्षा तो दिल्यासारखा दिसण्याला अधिक मोल होते. या अध्यायाची जबर, अनेकपदरी किंमत देशाला मोजावी लागली. सुप्रीम कोर्ट तसेच केंद्र व राज्य सरकारे यांना या आरक्षणाच्या इतिहासाचा विचार करावा लागेल. अंतिम निकाल देण्यापूर्वी न्यायालय निरीक्षणे नोंदवते. ती निकालात समाविष्ट नसली तरी न्यायमूर्तींची विचारप्रक्रिया त्यातून कळते. 'ज्यांना आरक्षणाचा लाभ मिळून प्रगत होता आले आहे; त्यांनी आपली नैतिक जबाबदारी मानून आरक्षणाचा हा लाभ आपल्यापेक्षा मागास असणाऱ्यांसाठी स्वत:हून सोडावा,' असे घटनापीठाने म्हटले आहे. हे उपेक्षित मागास आरक्षण घेतलेल्या कुटुंबांच्या किंवा इतर जमातीमधील असू शकतात. मात्र, १९५१ पासून ज्यांना आरक्षणाचा लाभ शिक्षण तसेच नोकरी मिळविताना झाला आहे; आणि ज्यांची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक उन्नती झाली, त्यांनी स्वत:चा समावेश खुल्या प्रवर्गात करून घ्यायला हवा. देशात किंवा राज्यात अशी मोजकी कुटुंबे असतीलही. मात्र, या साऱ्या 'त्यागा'ची नीट व्यवस्था लावावी लागेल. तशी ती लावताना राज्यघटनेच्या मूळ चौकटीला तसेच आरक्षणाच्या पद्धतीला धक्का लागता कामा नये. या दृष्टीने सुप्रीम कोर्ट काय म्हणते, हे निकालात समजेल. सध्याचा सुप्रीम कोर्टासमोरचा तातडीचा प्रश्न सवलती मिळणाऱ्या प्रवर्गातील अधिक मागासांसाठी सब-कोटा निर्माण करता येतो का, हा आहे. हा निकाल सोपा नाही. सबकोट्याची टक्केवारी कशी ठरवायची आणि तिचे वाटप कसे करायचे, हे ठरविणे अवघड आहे. यासाठी देशात जनगणना आणि जातगणना होणे आवश्यक आहे. अनेक नेते वारंवार जातगणनेच्या विरोधात बोलतात. मात्र, सखोल जातगणना झाल्याशिवाय मागास जाती-पोटजाती आणि त्यांच्यातील मागासांचे नेमके प्रमाण कळणार नाही. ते कळत नाही, तोवर न्यायालयाने सब-कोटा मान्य केला तरी त्याचा लाभ खऱ्याखुऱ्या गरजूंना लोकसंख्येच्या प्रमाणात मिळणार नाही. भारतीय जातिव्यवस्था जितकी गुंतागुंतीची आणि व्यामिश्र आहे; तितकीच तिच्यासाठी बनविलेली अन्यायनिवारण प्रणालीही गुंतागुंतीची असणार, याचे भान आपण ठेवलेले नाही. वेगवेगळी संख्याशास्त्रीय मॉडेल्स, आजची विज्ञान-तंत्रज्ञानाची प्रगती, प्रामाणिक इच्छाशक्ती आणि अचूक, सविस्तर जातगणना यांच्या आधारे सध्याचे आरक्षणाचे धोरण शास्त्रीय पद्धतीने शेवटच्या समाजघटकांपर्यंत पाझरत गेले पाहिजे. हे काम न्यायालयाचे नसून केंद्र सरकारचे आहे. या कामाचे भान न ठेवता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंडित नेहरू यांचा आरक्षणाला विरोध होता, असे म्हणावे, हे खेदजनक आहे. पंडित नेहरू पंतप्रधान असतानाच आरक्षणाची तरतूद आली; इतकेच नव्हे तर ती पहिली मुदत संपल्यावर वाढविण्यातही आली. भारतीय समाजाने आरक्षणाचा मुद्दा अनावश्यक संवेदनशील बनवला आहे. त्याला भावविवश किंवा पक्षपाती न होता वैज्ञानिक दृष्टीने भिडण्याची गरज आहे. नेत्यांना नेहेमीच 'जैसे थे' स्थिती तिच्यातल्या अंतर्विरोधांचे स्वार्थासाठी उपयोजन करण्यासाठी आवडते. सुशील समाज म्हणजे सिव्हिल सोसायटीने अशा समस्यांचा विचार करायचा असतो. भारतात अशांसाठी विचार करण्याची आणि तो निर्भिडपणे मांडण्याची मुभा आपण शाबूत ठेवली आहे काय?

## जाहिर नामा

मा.श्रीमती एस.बी.बेग सह दिवाणी न्यायाधीश
व.स्तर, बीड, ता.जि.बीड यांचे न्यायालयात
किरकोळ दि.अर्ज क्र. २४४/२०२४
वि.निरंक

**मागणी : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

**अर्जदार : १) सुमित्रा भ्र. भुरलीधर जाधव, वय ७० वर्षे, धंदा घरकाम,पत्ता नेकनूर, ता.जि.बीड, २) दादाराव मुरलीधर जाधव, वय ४५ वर्षे, धंदा शेती, नेकनूर, ता.जि. बीड, ३) उर्मिला भ्र. बाबासाहेब मुळे, वय ४८ वर्षे, धंदा घरकाम, शिंदी, ता.केज,जि.बीड, ४) सुनिता भ्र. पांडुरंग जाधव, वय ४८ वर्षे, धंदा घरकाम, नेकनूर, ता.जि.बीड, ५) राहूल पांडुरंग जाधव, वय ३२ वर्षे, धंदा शेती, नेकनूर, ता.जि.बीड, ६) पल्लवी भ्र. सचिन कागदे, वय २८ वर्षे, धंदा घरकाम, एम -११०/४ रामनगर, एन -२, सिडको छत्रपती संभाजीनगर, ता.जि.छत्रपतीनगर,**

**विरूध्द निरंक**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

ज्याअर्थी **मुरलीधर गणपत जाधव** हे राहणार नेकनूर, ता.जि.बीड हे दिनांक १५/१०/२०२२ रोजी नेकनूर, बीड, ता.जि.बीड येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार क्र. १ ही मयत नामे **मुरलीधर गणपत जाधव** यांची पत्नी असून अर्जदार क्र. २ हा मयताचा मुलगा व ३ ही मयताची विवाहित मुलगी आहे. अर्जदार क्र. ४ ही मयताची सुन म्हणजेच मयताचा मयत मुलगा नामे **पांडुरंग** यांची पत्नी आहे. अर्जदार क्र. ५ व ६ हे **मयत मुरलीधर** यांची नातवंडे आहेत.

**मयत नामे मुरलीधर गणपत जाधव** यांचे निधन झाले. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरिता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की,सदरहू अर्जदार सदहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहू **मयत मुरलीधर गणपत जाधव** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सदर प्रकरणात पुढील तारीख १२/०३/२०२४ आहे.**

**आज दिनांक १५/०२/२०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.**

**क.लिपीक**
**सह दिवाणी न्यायालय व.स्तर,बीड**

**कोर्टाचा शिक्का**

**मार्फत ॲड. शिंदे**

**आदेशावरून स्वाक्षरीत अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व.स्तर बीड**

# चुकीला माफी नाही -ठाकरे



**नगर । वृत्तसेवा**

चुकीला माफी असते, पण गुन्ह्याला नसते. सेनेच्या भगव्याला कलंक लावण्याचा प्रयत्न करणारा येथील गद्दार खासदाराने शिवसेना फोडणार्यात सामील होण्याचा गुन्हा केलाय. त्यामुळे त्यांच्या चुकीला माफी नाही, अशा शब्दात उबाठा सेनेचे प्रमुख उध्दव ठाकरे यांनी खासदार सदाशिव लोखंडे यांच्यावर पुन्हा निशाणा साधला. आता तर लोखंडेंना उमेदवारीच मिळणार नसल्याचा दावाही ठाकरे यांनी केला. संवाद मेळाव्याच्या निमित्ताने उध्दव ठाकरे यांनी बुधवारी दुसर्या दिवशी जिल्ह्यातील संगमनेर, कोपरगाव, अकोले येथे खा.लोखंडे यांच्यासोबतच भाजपवर घणाघात केला. ठाकरे म्हणाले, शिवसेनेसोबत अनेकांनी गद्दारी केली, तरीही भगवा फडकत राहिला. संकट येत, पण ज्याच्या हृदयात भगवा आहे, ते संकटाला घाबरत नाहीत. खासदार स्वत:च गद्दार झाला, त्यांना निवडून देणारे निष्ठावंत मात्र माझ्यासोबत राहिले. खासदाराला गतवेळीच निवडून येणे कठिण होतं. शिवसैनिकांच्या मनात ते नव्हते. सेनेचे लेबल लागले म्हणून श्रध्देपायी एकदा नव्हे तर दोनदा सेनेचा उमेदवार म्हणून जबरदस्तीने काम करून त्यांना निवडून द्यावं लागलं. आता ते स्वत:हून गेले आहे. तुमची निशाणी धनुष्यबाण नसून, कपाळावर बसलेला गद्दारीचा शिक्का हीच आहे. धनुष्यबाण त्यांनी पेलून दाखवावे, असे आव्हानही त्यांनी दिले. त्यांना भाजपची उमेदवारी मिळणार नाही. भाजपनेही त्यांना उमेदवारी देवून दाखवावी, असे आवाहन ठाकरे यांनी भाजपला दिले. भाऊसाहेब वाकचौरेही पक्ष सोडून गेले होते, पण परत आले. त्यांनी शिवसेना चोरण्याचा प्रयत्न केला नाही. पण लोखंडे यांनी शिवसेना चोरण्याचा प्रयत्न केला. सेना आमची आहे. येथील गर्दीवरून ते दिसते. चोरांच्या हातात शिवसेना देता, त्यात येथील गद्दार सामील होतो, हा कलंक असून भगव्याला छेद देण्याचा गुन्हा त्यांनी केला असल्याने गुन्ह्याला माफी नाही, आता त्यांना गाडलेच पाहिजे, अशा शब्दात ठाकरे यांनी ठणकावले. निळवंडे धरणाबाबत बोलताना ठाकरे म्हणाले, ही योजना पूर्ण करण्यासाठी आम्ही पैसे दिले, आणि हे टिकोजीराव आम्ही काम केलं, असे म्हणत श्रेय घ्यायला येत असल्याचा टोला ठाकरे यांनी मारला. कोपरगावला आठ दिवसात एकदा पाणी मिळते. पाण्याचा हा प्रश्न कायमचा सुटावा म्हणून मविआ सरकार असताना १२१ कोटी रुपये निधी दिला. ते काम आता अंतिम टप्प्यात आहे. त्याचे श्रेय घ्यायलाही पंतप्रधान मोदी येतील असा उपहासात्मक टोलाही ठाकरे यांनी लगावला. 'मी उध्दव ठाकरे' लिहिलेल्या टोप्या पाहून ठाकरे म्हणाले, सगळ्या बाजुने घेरले, पण उध्दव ठाकरेंना संपवता येत नाही, हेच भाजपला कळत नसल्याचे ते म्हणाले. कोपरगावच्या सभेला जिल्हाध्यक्ष रावसाहेब खेवरे, माजी नगराध्यक्ष राजेंद्र झावरे, संजय सातभाई, ऐश्वर्या सातभाई, शहर प्रमुख आप्पासाहेब केसेकर, विधानसभा संघटक कैलास वाकचौरे, उपशहर प्रमुख पप्पू कानकाट, अमर कतारी, महिला आघाडी प्रमुख शितल हासे, अमित चव्हाण उपस्थित होते. शिवसेना नेते खासदार संजय राऊत यांनी कोपरगावला आठ दिवसांतून मिळणार्या पाण्याबद्दल आश्चर्य व्यक्त करताना येथील सम्राट समजले जाणारे नेते कोपरगावच्या जनतेला शुद्ध पाणी देऊ शकत नाही, तर तुमची सत्ता काय कामाची असे टीकास्त्र सोडत 'ना काळे, ना कोल्हे यावेळी ठाकरेंच्या नेतृत्वाखाली फक्त सेनेचा वाघच निवडून आणू' असे आवाहन केले.

## डॉ.नूतन जोशी यांना सुवर्णपदक

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील डॉ. नूतन दामोदरराव जोशी वाढवणकर यांनी चेन्नई येथील एम. जी. आर. वैद्यकीय विद्यापीठाचे डी.एम. हिमॅटोलॉजी (रक्तविकार आणि चिकित्सा विज्ञान) या विषयातील सुवर्णपदक पटकावले आहे. या पूर्वीही डॉ. नूतन यांनी सुपरस्पेशालिटीच्या नीट परीक्षेत देशात प्रथम क्रमांक मिळविला होता. अंबाजोगाईच्या रहिवासी असलेल्या डॉ. नूतन या येथील गोदावरीबाई कुंकुलोळ योगेश्वरी कन्या शाळेच्या विद्यार्थिनी आहेत.



लहानपणापासूनच त्यांनी शालेय तसेच स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तुंग यश मिळविले आहे. मुंबईच्या लोकमान्य टिळक वैद्यकीय महाविद्यालय, सायन येथून त्यांनी एम.बी.बी.एस. व एम. डी. मेडीसिन केले. पुढे तामिळनाडू मधील वेल्लोरच्या ख्रिश्चन मेडिकल कॉलेज मधून त्यांनी आपला हिमॅटोलॉजी मधील सुपरस्पेशालिटीचा अभ्यासक्रम पूर्ण केला. सध्या त्या तेथेच आपली सेवा देत आहेत. आपल्या उत्तुंग यशाने त्यांनी अंबाजोगाई करांचा लौकिक वाढविला आहे.

## आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा आयुर्वेदिक औषधी वनस्पतींवर अभ्यास

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील आदित्य आयुर्वेद महाविद्यालयातील ५० विद्यार्थ्यांनी तालुक्यातील गोरक्षनाथ टेकडी येथील नक्षत्र उद्यानाला औषधी वनस्पती दर्शन व अभ्यास सहलीदरम्यान नुकतीच भेट दिली. यावेळी तेथील विविध ३७ आयुर्वेदीक औषधी वनस्पतींचा अभ्यास केला. शहरातील आदित्य शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबर, क्रीडा आणि प्रत्यक्षीकांवर जास्त भर दिला जातो. त्यामुळे येथील विद्यार्थी परिपूर्ण होऊन बाहेर पडतात. आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, आदित्य शिक्षण संस्थेचे संचालकडॉ. आदित्य सारडा, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी च्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली आदित्य आयुर्वेद महाविद्यालयातील ५० विद्यार्थ्यांची नुकतीच औषधी वनस्पती दर्शन व अभ्यास सहल संपन्न झाली. यामध्ये विद्यार्थ्यांनी बीड तालुक्यातील गोरक्षनाथ टेकडी येथील नक्षत्र उद्यानाला भेट दिली. यावेळी गुळवेल, प्लक्ष, अर्क, अर्जुन, खडीर, आम्र, बदर, वट, बांबू, शमी, वासा, औदुंबर, अपामार्ग, रक्तचंदन, सप्तपरणी, पलाश, बदर, बबुल, अमालकी, जम्बु, सिसम, गोखरू, आलमतक, अश्वगंधा, शिषपा, कुमारी आदी एकूण ३७ आयुर्वेदीय औषधी वनस्पतींचा अभ्यास विद्यार्थ्यांनी केला.त्यांना प्रचार्य डॉ. विवेक कुलकर्णी, डॉ. गनंजय देशपांडे, प्रा. रामेश्वर ढोबळे, डॉ. शैलेश शिवनकर, डॉ. दत्तू करंडे, डॉ. विवेक मुळे यांनी मार्गदर्शन केले.

## जाहिर प्रगटन

**मा.अविनाश म.पाटील ५ वे दिवाणी न्यायाधीश**
**क.स्तर, बीड, ता.जि.बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर २६८/२०२४**
**मंगल व ई. वि.निरंक**

ज्यापेक्षा **दत्तात्रय आश्रुबा लोणकर**, रा. लोणी शहाजानपूर, पो.नाथापूर, ता.जि.बीड हे दिनांक ११/०२/२०२२ रोजी मयत झालेले आहेत. आणि तसेच अर्जदार

**१) मंगल रामभाऊ लोणकर, पत्ता लोणी-शहाजानपूर, पो.नाथापूर, ता.जि.बीड, २) सुधीर रामभाऊ लोणकर, लोणी शहाजानपूर पो.नाथापूर, ता.जि.बीड, ३) उर्मिला वैभव मस्के, आशिर्वाद अपार्टमेंट, प्लॉट नं. १, कानडे नगर, साई मंदिर रस्ता, पिंपळे गुरव, पुणे, ४) राधिका रामभाऊ लोणकर, स्वराज्यनगर, बीड, ता.जि.बीड.**

अर्जदार क्र. १ ही **मयत दत्तात्रय आश्रुबा लोणकर** यांची सुन असून अर्जदार क्र. २ ते ४ हे मयताचे नातवंडे आहेत. या अर्जदारा व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत, त्यांनी ह्या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना/अर्जदारांना सदरहू **मयत दत्तात्रय आश्रुबा लोणकर** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

**पु.ता. २१/०३/२०२४**

**आज दिनांक १२/०२/२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**

**क.लिपीक**

**कोर्टाचा शिक्का**

**मार्फत ॲड.गिराम**

**आदेशावरून स्वाक्षरीत/- अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर,बीड.**

## जाहिर प्रगटन

**मा.श्रीमती पी.डी.चव्हाण ४ थे सह दिवाणी न्यायाधीश,**
**क.स्तर, बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज २८२/२०२४**
**मंगल भ्र.भगवान पंडीत व इतर विरूध्द निरंक**

**अर्जदार : १) मंगल भ्र. भगवान पंडीत, वय ६५ वर्षे धंदा घरकाम, रा. रामतीर्थ, हनुमान नगर, बहीरवाडी, बीड, ता.जि.बीड, २) दिपक पि. भगवान पंडीत, वय ३१ वर्षे, धंदा मजुरी, रा.वरीलप्रमाणे, ३) संगीता भ्र. गणेश पांचाळ, वय ४८ वर्षे, धंदा घरकाम, रा. चौरांबा, ता.धारूर, जि.बीड, ४) गिता पि. भगवान पंडीत, वय ४६ वर्षे, धंदा घरकाम, रा. रामतीर्थ, हनुमान नगर, बहीरवाडी, बीड, ता.जि.बीड, ५) सिमा भ्र. दादासाहेब पांचाळ, वय ४२ वर्षे, धंदा घरकाम, रा. चौरांबा, ता.धारूर,जि.बीड.**

**(अर्जदार हे भारतीय आहेत)**

**विरूध्द निरंक)**

**मागणी अर्ज - बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात **मयत भगवानराव बाबुराव पंडीत** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी **भगवानराव बाबुराव पंडीत** यांचा मृत्यू दिनांक २८/०९/२०२१ रोजी हनुमान नगर, बीड, ता.जि.बीड येथे झाला असून अर्जदार क्र. ०१ ही मयताची पत्नी आहे. अर्जदार क्र. ०३ ते ०५ ह्या मयताच्या विवाहित मुली असून अर्जदार क्र. २ हा मयताचा मुलगा आहे. हे कायदेशीर वारस आहे. वरील अर्जदारांस शासकीय व निमशासकीय कामाकरिता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर त्यांनी या जाहिर नाम्याच्या तारखेपासून एक महिन्यात या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदर मुदतीत कोणी आल्या योग्य हरकती दाखविल्या नाही तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याना सदरहू **भगवानराव बाबुराव पंडीत** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक १४ माहे फेब्रुवारी २०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**

**सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २१ मार्च २०१४.**

**क.लिपीक**

**कोर्टाचा शिक्का**

**मार्फत ॲड. गायकवाड**

**आदेशावरून स्वाक्षरीत/- अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय,व.स्तर,बीड**


पान १ वरून....


### मराठा आंदोलनाला

वसमत व कळमनुरी आगारातून बसेस सोडण्यात आल्या नाहीत. तर ग्रामीण भागातूनही प्रवासी शहराकडे आले नाहीत. त्यामुळे बसस्थानकांवर शुकशुकाट निर्माण झाला होता. तर शासकिय व निमशासकिय कार्यालयात बाहेरगावाहून येणार्या कर्मचार्यांची मोठी अडचण झाली. दरम्यान, वसमत ते परभणी मार्गावर खांडेगाव पाटीजवळ रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामध्ये काही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी वाढीव पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. तर आंदोलनापासून काही अंतरावर वाहने थांबविण्यात आली होती. आज सकाळी सव्वा आठ वाजण्याच्या सुमारास वसमत आगाराची वसमत ते पुणे ही बस मार्गस्थ झाली होती. मात्र, खांडेगाव पाटीपासून काही अंतरावरच बस थांबविण्यात आल्याने त्यातील सर्व प्रवासी उतरून गेले होते. दरम्यान, दुचाकीवरून आलेल्या अज्ञात तरूणांनी बस पेटवून दिली. यावेळी वसमत ग्रामीण पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक अनिल काचमांडे, उपनिरीक्षक यामावार, जमादार विजय उपरे, अविनाश राठोड यांच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी वसमत पालिकेच्या अग्निशमन दलास पाचारण केले. दोन तासांनी आग आटोक्यात आली. तोपर्यंत बसमधील सर्व सीट जळून खाक झाल्या होत्या. यामध्ये महामंडळाचे सुमारे ४० लाखांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या शिवाय शिरड शहापूर जवळ दोन बसवर दगडफेक झाल्याचे सुत्रांनी सांगितले. मात्र, इतर ठिकाणी रास्ता रोको शांततेत पार पाडल्याचे पोलिसांनी सांगितले.

### राज्यातील सरकार

गोष्टी सांगितल्या जात आहेत. प्रेमाची नाती जपायची असतात, ती तोडायचे नसतात, पण मला असं वाटतं नाही. हा संघर्षाचा काळ आहे, कारण मैदान सगळ्यांसाठी खुले आहे. जो संघर्ष करेल तोच मैदान जिंकेल, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या. आपण आपला पक्ष आणि विचार लोकांपर्यंत पोहचवायचा आहे, असेही यावेळी सुप्रिया सुळे म्हणाल्या. सकाळी इलेक्ट्रोल बाँडची परवानगी होती. ८ वर्षांपूर्वी आम्ही याला विरोध केला होता. भाजप आम्हाला याबाबत विरोध करत होते, मात्र आता सुप्रीम कोर्टाने हा विषय थांबवला आहे. सगळ्यात जास्त ५ हजार कोटी रुपयांचे इलेक्ट्रोल बाँड भाजपकडे आहेत, कोर्टाने याची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. देशातील सगळ्यात मोठा भ्रष्टाचार हा पेटीएममध्ये झाला आहे. भाजपला मला सवाल करायचा आहे की भाजप कडून जिथं धाड मारली जाते तिथं इतक्या नोटा येतात कुठून? डिजिटल पेमेंट सिस्टीम यांनी आणलं. २७ हजार कोटी रुपये भ्रष्टाचार पेटीएममध्ये झाला आहे. यात सर्वात मोठी गुंतवणूक चायनाची आहे. एकीकडे त्यांच्यासोबत तूम्ही संघर्ष करता आणि दूसरीकडे हा व्यवहार झालाच कसा काय? असा आरोप सुप्रिया सुळे यांनी केला. राज्याचे मुख्यमंत्री म्हणतात अदृश्य शक्ती हे राज्य चालवते. मी त्याच्या विरोधात लढण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या पोलीस ठाण्यात बंदुकीतून गोळीबार केला जातोय, आपल्याला आरआर आबा यांच्यासारखा गृहमंत्री हवा आहे की देवेंद्र फडणवीस गृहमंत्री असलेलं राज्य हवं आहे. सध्या अबकी बार गोळीबार सरकार अशी स्थिती आहे. मागचा काळात व्हाईट पेपर सरकारने काढला होता. त्यामध्ये एक विषय होता. ज्यांच्या बाबत हा विषय होता तो थेट सत्ताधारी पक्षात सहभागी झाला आहे. यांचा आदर्श नेमका काय घ्यावा, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या. मला आयुष्यात दोन ऑप्शन होते, एका बाजूला संघर्ष,वडील तर दूसरीकडे सत्ता हा पर्याय होता. मी संघर्ष हा पर्याय निवडला आहे. नवीन पक्ष काढू नवीन चिन्ह घेऊ पण ओरबाडून काही घ्यायच नाही. पंकजा मुंडे सातत्यानं संघर्ष करत आहेत, मात्र त्या जागेवरून हटल्या नाहीत. लेकी ह्या लढणाऱ्या असतात मागे हटणाऱ्या नाही, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या.

### मराठवाड्यात महाविद्यालय

पहिले भावसार विधी महाविद्यालय,वसमत जिल्हा हिंगोली यासाठी मागणी करण्यात आली होती. भाजपचे आमदार डॉक्टर तुषार राठोड यांनी तसेच महाराष्ट्रातून भावसार समाजाच्यावतीने चंद्रकांत दादांना यासाठी निवेदन देखील देण्यात आले होते . तरी देखील त्या निवेदनाला चंद्रकांत दादा पाटील यांनी केराची टोपली दाखवत भावसार विधी महाविद्यालयाला परवानगी नाकारली. यामुळे महाराष्ट्रातील भावसार समाज संतप्त बनला असून लवकरच भावसार समाजाच्या वतीने एक वेगळा निर्णय घेण्यात येईल , असे भावसार समाजाच्यावतीने कळविण्यात आले आहे. मराठवाड्यात भाजपच्या समर्थकांना नाराजीचा सामना करावा लागत आहे .भाजपेतर आमदार असलेल्या राष्ट्रवादींच्या संस्थांना उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी झुकते माप दिल्याने चंद्रकांत दादांच्या या धोरणाविरुद्ध तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

### शिवजयंती सामाजिक

बीड शहर करण्यासाठी सर्वांनी पोलिसांना सहकार्य करण्याचे आवाहन केले तसेच कारवाई करण्याचे संकेत दिले. तसेच मा पोलीस अधीक्षक ठाकूर सर यांनी शहरातील छत्रपती शिवाज महाराजांच्या पुतळा, इतर सर्व चौक तसेच शहरातील वर्दळीच्या ठिकाणी असलेले अवैध बॅनर संबंधित विभागाच्या समन्वयाने काढून बीड शहर बॅनरमुक्त करण्याबाबत शहरातील सर्व ठाणे प्रभारी यांना सूचना दिल्या आहेत. तसेच सार्वजनिक कार्यक्रम दारुमुक्त करण्यासाठी पोलिसांना कारवाया करण्याचे आदेशीत केले.नशा करणारे आणि त्याच्या औषधे विकणारे यांच्या विरुद्ध पुन्हा एकदा कठोर कारवाई साठी शहरातील प्रभारी अधिकारी यांना आदेशीत केले आहे. जयंती आणि पूर्ण उत्सव शांततेत आणि उत्साहात पार पाडावा असे आवाहन पोलीस अधीक्षक श्री नंदकुमार ठाकूर यांनी केले आहे.

## जाहिर प्रगटन

**मा.श्रीमती टी.ए. आसरकर ३ रे सह दिवाणी**
**न्यायाधीश, क.स्तर, बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज २९५/२०२४**
**प्रमिला व ईतर विरूध्द निरंक**

**अर्जदार - १) प्रमिला अंकुश वाघ, वय ५८ वर्ष, धंदा घरकाम, पत्ता मु.पो. खडकीघाट, ता.जि.बीड, २) रूपा अंकुश वाघ, वय ३५ वर्ष, धंदा घरकाम मु.पो. खडकीघाट,ता.जि.बीड, ३) दिपाली अंकुश वाघ, वय ३७ वर्ष, धंदा नौकरी, मु.पो. खडकीघाट,ता.जि.बीड, ४) गणेश अंकुश वाघ, वय ३३ वर्ष, धंदा नौकरी, मु.पो. खडकीघाट,ता.जि.बीड.**

**विरूध्द निरंक**

**मागणी अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात **मयत अंकुश लक्ष्मण वाघ** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी **मयत नामे अंकुश लक्ष्मण वाघ** यांचा मृत्यू दि.१५/०६/२००६ रोजी राहते घरी कल्याण येथे झाला असून अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क्र. २ व ३ या मयताच्या मुली आहे. तसचे अर्जदार क्र. ४ हा मयताचा मुलगा आहे. वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्यांचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू **मयत अंकुश लक्ष्मण वाघ** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक १४ माहे फेब्रुवारी २०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**

**सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २१ मार्च २०२४.**

**क.लिपीक**

**कोर्टाचा शिक्का**

**मार्फत ॲड. गोरे**

**आदेशावरून स्वाक्षरीत/- अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर,बीड**

## जाहिर प्रगटन

**मा.श्री.संजय टी. सहारे, २ रे सह दिवाणी**
**न्यायाधीश,क.स्तर, बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज १७८/२०२४**

**अर्जदार :- १) रतनबाई गोविंदराव खाकरे, वय ५० वर्षे, धंदा शेती रा. सावरगांव घाट, खडकीघाट, ता.जि.बीड, २) मिनाक्षी प्रदिप जोगदंड, वय ३५ वर्षे,धंदा घरकाम व शेती, रा. वानगाव, ता.जि.बीड, ३) राणी भारत गायकवाड, वय ३० वर्षे, धंदा घरकाम, रा. अंजिक्यतारा हाउसींग सोसायटी चिखली, ताम्हणे वस्ती, खिखली वस्ती, पुणे, ४) आसाराम गोविंदराव खाकरे, वय २५ वर्षे, धंदा खाजगी नौकरी व शेती, रा. संत तुकाराम निवास, गावठाण रोड, म्हतोबा मंदिर, हिंजवडी, पुणे.**

**प्रकरण - बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत.**

ज्याअर्थी **नामे गोविंद बाबुराव खाकरे** हे दि. १६/०२/२०२२ रोजी राहते घरी सावरगांव घाट, ता.जि.बीड येथे मयत असून अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी आहे तर अर्जदार क्र. २ व ३ मयताच्या विवाहित मुली आहेत. अर्जदार क्र. ४ हा मयताचा मुलगा आहे. मयताचे आई-वडील फार पुर्वीच मयत झाले आहेत. अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे. अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**आज दिनांक १२/०२/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.**

**पुढील तारीख १३/०३/२०२४**

**कोर्टाचा शिक्का**

**मार्फत ॲड. गिराम**

**आदेशावरून स्वाक्षरीत/- अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय,बीड**

## जाहिर प्रगटन

**मा.श्री.एम.आय.एस. दर्यावर्दी, ७ वे दिवाणी न्यायाधीश**
**क.स्तर, बीड, ता.जि.बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. २९९/२०२४**
**लधा व इतर वि.निरंक**

ज्यापेक्षा **रामभाऊ मारोती खामकर, रा. उदंडवडगांव, ता.जि.बीड** हे दिनांक ०५/१२/२०१५ रोजी उदंडवडगांव, ता.जि.बीड येथे मयत झालेले आहे, आणि तसेच अर्जदार

**१) लधा भ्र. रामभाऊ खामकर, वय ५५ वर्षे, धंदा घरकाम, २) संतोष पि. रामभाऊ खामकर, वय २४ वर्षे, धंदा नोकरी, दोघे रा. उदंडवडगांव, ता.जि.बीड, ह.मु. नॉर्थ वॉल रोड, कोंडीहोप, चेन्नई, तामिलनाडू.**

अर्जदार क्र. १ ही मयत नामे **रामभाऊ मारोती खामकर** यांची पत्नी आहे. अर्जदार क्र. ०२ हा मयताचा मुलगा आहे. या अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत, त्यांनी ह्या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट , सदरहू अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/अर्जदारांना सदरहू **रामभाऊ मारोती खामकर** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

**प्रकरणाची पुढील तारीख २१/०३/२०२४ ही आहे.**

**आज दिनांक १३ फेब्रुवारी २०२४ माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**

**कनिष्ठ लिपीक**
**सह दिवाणी न्यायालय क.स्तर,बीड**

**कोर्टाचा शिक्का**

**मार्फत ॲड.गवळी**

**आदेशावरून स्वाक्षरीत/- अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क.स्तर,बीड**

दैनिक
# मराठवाडा पत्र

बीड विशेष

• शनिवार,दि.१७ फेब्रुवारी २०२४ •पान ४

## गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना अंतर्गत होणार कामे

बीड – राज्य शासनाच्या वतीने गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना राबविण्यात येत असून त्या अनुषंगाने गाळ काढणे व तो शेतामध्ये वापरणे यासाठी जलसाठ्यातील गाळ काढून तो शेतात पसरविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत जलसाठ्यामधून गाळ काढण्याची अंमलबजावणी ही अशासकीय संस्थेमार्फत करण्यात येत होती. दिनांक ५ फेब्रुवारी २०२४ च्या शासन पूरकपत्रान्वये आता योजनेअंतर्गत जलसाठ्यामधून गाळ काढण्याची अंमलबजावणी अशासकीय संस्था तसेच ग्रामपंचायती मार्फत करण्यात येणार आहे.याबाबत सर्व माहिती मृद व जलसंधारण विभागाच्या दिनांक २० एप्रिल २०२३ रोजी शासन निर्णय व ५ फेब्रुवारी २०२४ शासन पूरक पत्रकामध्ये नमूद केली आहे. बीड जिल्ह्यात गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना अधिक सुलभतेने व गतीने राबविण्यासाठी जास्तीत जास्त ग्रामपंचायत, अशासकीय संस्थांनी आपले प्रस्ताव सर्व कागदपत्रासह (प्रमाणपत्रासोबत) जिल्हा जलसंधारण अधिकारी मृद व जलसंधारण विभाग, बीड या कार्यालयास सादर करावेत, असे आवाहन दिनांक १३ फेब्रुवारी २०२४ रोजी आढावा बैठकीमध्ये जिल्हाधिकारी यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, बीड या कार्यालयाशी संपर्क साधावा.

## छत्रपती संभाजी क्रिडा संकुलची दुरावस्था

बीड – बीड शहरातील भिंती रंगवून शहरातील व्यावसायिक व सार्वजनिक परीसर आता अधिक स्वच्छ व सुंदर आहेत . आम्ही तयार आहोत स्वच्छ सर्व्हेक्षण २०२३–२४ चला करुया नागरी महाराष्ट्र स्वच्छ आणि सुंदर अशी जाहिरात करत महिन्यांसाठी ४० लाख रुपये स्वच्छतेसाठी खर्च करणा–या बीड नगरपरीषदेला बीड शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण सार्वजनिक शौचालयाची अत्यंत दुरावस्था असुन याकडे नगरपरिषद प्रशासनाने दुर्लक्ष दिसत असुन याविषयी बीडकरांमध्ये तीव्र नाराजी असुन क्रिडांगणांची दुरूस्ती कागदोपत्रीच असुन नगरपरिषद नेमकं जनतेचा पैसा कोठे खर्च करत आहे असा सवाल सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे यांनी विचारला आहे. छत्रपती संभाजी महाराज क्रिडा संकुलाच्या ठिकाणी असलेले सार्वजनिक स्वच्छतागृह अत्यंत दुरावस्थेत असुन पाण्याची सोय नाही,तुंबलेले शौचालय यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरलेली असुन क्रिडांगणाच्या ठिकाणी येणाऱ्या नागरीकांची गैरसोय होत असुन नियमित स्वच्छता करणे आवश्यक आहे.स्वच्छता निरीक्षकांचे याकडे दुर्लक्ष असुन नेमका पगार कशाचा घेतात असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

## लाभार्थींना अनुदान वाटप

बीड – संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावण बाळ शिवाजी निवृत्तीवेतन योजनेची अनुदान डीबीटी द्वारे करण्यासाठी दिनांक ७ फेब्रुवारी २०२४ रोजी सचिव सामाजिक न्यायविशेष सहाय्य विभाग यांच्या अध्यक्षतेखाली झालेले व्हिडिओ कॉन्फरन्स द्वारे मार्गदर्शन करण्यात आले होते तसेच दिनांक ९ फेब्रुवारी २०२४ रोजी श्रावण बाळ संजय गांधी योजनेचे अनुदान डीबीटीद्वारे करण्यासाठी आवश्यक कारवाई करणे बाबत जिल्हास्तरावर सर्व बैठक घेण्यात आली. सन २०२४ पासून लाभार्थ्यांना अनुदान हे डीबीटी द्वारे वितरित करणेबाबत शासनाचे धोरण आहे त्या अनुषंगाने सर्व लाभार्थ्यांनी संबंधित तलाठी यांच्याकडे आधार कार्ड, बँक पासबुक,लाभार्थ्यांचे मोबाईल नंबर, योजनेचे प्रकार, जात प्रवर्ग, दिव्यांगाचा प्रकार व दिव्यांग टक्केवारी, राशन कार्ड या सर्व कागदपत्राची छायांकित प्रत संबंधीत गावचे तलाठी यांच्याद्वारे दिनांक १७ फेब्रुवारी २०२४ पर्यंत संबधित कार्यालयात दाखल करावेत, असे आवाहन तहसीलदार सुहास हजारे यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे कळविले आहे.

## प्रहार शिक्षक संघटनेच्या राज्य उपाध्यक्षपदी अविनाश तांदळे

बीड – प्रहार शिक्षक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा प्रमुख मार्गदर्शक मा.ना. श्री.ओमप्रकाश उर्फ बच्चूभाऊ कडू अध्यक्ष दिव्यांग कल्याण मंत्रालय महाराष्ट्र राज्य , मुंबई यांच्या आदेशानुसार तसेच मा.श्री.राहुलजी मोहोड राज्य संपर्क प्रमुख तथा स्वीय सहाय्यक मा.ना.श्री.दिपकजी केसरकर शालेय शिक्षण व क्रिडा विभाग महाराष्ट्र राज्य यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.अविनाश कारभारी तांदळे यांची शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेऊन मुंबई येथे प्रहार शिक्षक संघटनेच्या महाराष्ट्र राज्याच्या उपाध्यक्षपदी श्री.विकास घुगे राज्यअध्यक्ष , प्रहार शिक्षक संघटना महाराष्ट्र राज्य यांनी नियुक्ती केली आहे. नुतन राज्य उपाध्यक्ष श्री.अविनाश तांदळे यांनी यापुर्वी विविध पदावर काम करत एक अत्यंत अभ्यासु लिडर , मनमिळावू लढावु नेतृत्व , जिद्दी व धाडसी निर्णय घेणारे असे नेतृत्व म्हणुन ते ओळखले जातात. त्यांनी आजवर अधिकारी / कर्मचारी यांच्या विविध परिषदा तसेच सामाजिक , शैक्षणिक , सांस्कृतिक कार्यात नेहमी अग्रेसर असलेले नेतृत्व म्हणुन ते जनमाणसात ओळखले जातात. जिल्हा परिषदेमध्ये त्यांनी त्यांच्या कार्यकाळात शिक्षकांच्या विविध प्रश्नांची सोडवणुक केली. हजारो शिक्षकांना जोडण्याचे महत्तवपुर्ण योगदान विचारात घेत त्यांच्याकडे राज्य उपाध्यक्ष पदाची धुरा सोपवली आहे.

# विकास कामांसाठी ८ कोटी ३० लक्ष रुपयांचा निधी मंजूर –आ.मुंदडा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहराच्या ऐतिहासिक आणि धार्मिक भावनांशी जोडल्या गेलेल्या खोलेश्वर मंदिर या राज्य संरक्षित स्मारकाच्या जतन व दुरुस्तीसाठी राज्य शासनाच्या वतीने ८ कोटी ३० लक्ष ४१ हजार १६८ रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.



महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने या संदर्भात शासन निर्णय क्र. स्मारक–२०२४/प्र.क्र.५७/सां.का.३ दि. १४ फेब्रुवारी २०२४ अन्वये हे आदेश काढण्यात आले आहेत. सदरील आदेशात पुढे असे म्हटले आहे की, मंत्रीमंडळाची विशेष बैठक छत्रपती संभाजीनगर येथे दिनांक १६.०९.२०२१ रोजी पार पडली होती. त्यामध्ये घेण्यात आलेल्या निर्णयामध्ये मराठवाडा विभागातील ऐतिहासिक वास्तुंचे संवर्धन करण्याचा समावेश करण्यात आला असून विशेषतः त्यामध्ये अंबाजोगाई येथील प्राचीन वास्तुस्थळाचा विकास करण्याबाबत घोषणा करण्यात आली आहे. मा. मंत्रीमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयानुसार अंबाजोगाई येथील खोलेश्वर मंदिराचे जतन व दुरुस्ती कामासाठी रु.८,३०,४१,१६८/– इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत उपनिर्दिष्ट पत्रान्वये संचालक पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय विनंती केली आहे, या स्मारकाचे अंदाजपत्रक सन २०२२–२३ ची राज्य दरसूची व स्थानिक बाजारभावानुसार तसेच पुरातत्व संकेतानुसार तयार करण्यात आलेले आहे. त्यानुसार या राज्य संरक्षित स्मारकाच्या जतन व दुरूस्ती कामाच्या रु.८,३०,४१,१६८/– इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सदरील शासन निर्णयान्वये खोलेश्वर मंदीर, ता. अंबाजोगाई, जि. बीड या राज्य संरक्षित स्मारकाच्या जतन व दुरूस्ती कामाच्या रू.८,३०,४१,१६८/– (अक्षरी रूपये आठ कोटी तीस लाख एक्केचाळीस हजार एकशे अडुसष्ट मात्र) इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. सदरील प्रशासकीय मान्यतेनुसार निविदा प्रक्रिया पूर्ण करुन याप्रकरणी न्युनत्तम निविदेचा प्रस्ताव तसेच खर्चास वित्तीय मान्यतेचा प्रस्ताव शासनास सादर केल्यानंतर प्रस्तावित खर्चास वित्तीय मान्यता देण्यात येईल. या साठी होणारा खर्च मागणी क्र. झेडडी–२, १०३, पुरातत्वशास्त्र, (०१) (०६) राज्यातील ऐतिहासिक व सांकृतिक दृष्ट्या महत्वाचे किल्ले व धार्मिक स्थळे यांची जपणूक व संरक्षण कार्यक्रम २२०५–१३०२ २७ लहान बांधकामे या लेखाशिर्षात त्या त्या वर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतूदीतून भागविण्यात यावा. असे या आदेशात म्हटले आहे. सदरील शासनर्णय हा महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने निगर्मित करण्यात आला असून या आदेशावर महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाचे उपसचीव नंदा मारोती राऊत यांची स्वाक्षरी आहे. अंबाजोगाई शहराच्या धार्मिक, पौराणिक आणि ऐतिहासिक परंपरेशी जोडल्या गेलेल्या या खोलेश्वर मंदिर राज्य संरक्षित स्मारक जतन व दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून घेण्यासाठी केज विधानसभा मतदारसंघाच्या आ. नमिता मुंदडा यांनी विशेष प्रयत्न केले आहेत. आ. नमिता मुंदडा या स्वतः एक आर्किटेक्ट असून केज विधानसभा मतदारसंघातील पुरातत्व काळातील वास्तु आणि मंदिरे जतन करून त्यांची दुरुस्ती करण्याच्या कामांवर त्यांचे विशेष लक्ष आहे. याच माध्यमातून त्यांनी अंबाजोगाई शहरात असलेल्या संकलेश्वर मंदीर, भुचरनाथ मंदिर, आद्यकवी मुकुंदराज स्वामी समाधी, जोगाई सभामंडप, छोटा हत्ती खाना व इतर धार्मिक स्थळांच्या जतन व दुरुस्तीसाठी कोट्यावधी रुपयांचा निधी शासनाकडून मंजूर करुन घेतला आहे. आता या खोलेश्वर मंदिर जतन व दुरुस्ती साठी ८ कोटी ३० लक्ष ४१ हजार १६८ रुपयांचा विशेष निधी राज्याच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडुन मंजूर करुन घेतला आहे. अंबाजोगाई शहर आणि परीसरातील प्रसिद्ध मंदिरापैकी एक असलेले हे खोलेश्वर मंदिर. सन १९६२ साली खोलेश्वराची मुलगी लक्ष्मी होने तीचा लहान भाऊ म्हणजे खोलेश्वराचा पुत्र 'राम' जो त्याकाळात झालेल्या एका लढाईत मारला गेला होता, त्याच्या स्मरणार्थ हे मंदीर उभारले असल्याचा उल्लेख या मंदीरातील शिलालेखात आहे. अंबाजोगाई शहराच्या दक्षीणेस जैत्रपाळ राजाच्या गढीजवळ पुर्वाभिमुख असे अतिशय देखणे असलेले हेमाडपंथी मंदीर हे खोलेश्वर मंदीर म्हणून ओळखल्या जाते. खोलेश्वर मंदीर हे शीव मंदीर आहे. त्याकाळी इतिहास न समजून घेतल्यामुळे खोलेश्वराचा देव होण्याची भिती निर्माण झाली आणि खोलेश्वराच्या अंबानगरीवरील प्रभावामुळे या मंदीराचे नांव खोलेश्वर पडले असावे. खोलेश्वर मंदिर हे शिव मंदिर असून एका मोठ्या चबुत–यावर उभे आहे. मंदीराचे प्रवेशद्वार म्हणजे सुंदर नक्षीकाम केलेला दगडी मंडप आहे. चार दगडी स्तंभावर उभ्या असणाऱ्या या मंडपातुन चार पाय–या वर चढून वर गेले की, डाव्या हाताला मंदीराचा शिलालेख लागतो. यावरुन हे मंदीर शके ११६२ (इ. सन १२४०) मध्ये उभारल्याचे सिध्द होते. मंदिर बांधकामाच्या शैलीने हे मंदीर तेराव्या शतकाचे प्रतिनिधित्व करते. यादवकालीन मंदीर वैशिष्ट्याच्या दृष्टीने खोलेश्वर मंदिर हे एक उत्तम उदाहरण आहे. निजाम काळात या मंदीराचे सभागृह कोर्ट म्हणून वापरल्या जायचे. नंतर ते इतरत्र हलवण्यात आले. हे मंदीर ठोस कोरीव नक्षीदार डगरीवर उभारले आहे.



बीड – भोपाळ विमानतळ येथे तैलीक साहू सभेच्या वतीने अखिल भारतीय तैलीक साहू महासभेचे अध्यक्ष माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे स्वागत करताना ओमप्रकाश साहू इत्यादी.

## मराठा आरक्षण योद्धा जरांगे पाटील यांना पाठिंब्यासाठी लाक्षणिक उपोषण

**बीड । प्रतिनिधी**

मराठा आरक्षण

मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी सगेसोयरेचा कायदा लागु करावा यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी सुरू केलेल्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी सकल मराठा समाजाने आज दि.१४ बुधवार रोजी महाराष्ट्र बंद ची हाक दिली असुन जिल्हा बंद बाबत मराठा क्रांती मोर्चाने केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील ग्रामस्थांनी सर्व दुकाने,हाटेल्स व व्यावहार बंद ठेवून कडकडीत बंद पाळला असुन मनोज जरांगे पाटलांच्या उपोषण समर्थनार्थ डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली ग्रामपंचायत कार्यालयासमोर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून एकदिवसीय लाक्षणिक उपोषण सुरू करण्यात आले आहे. यावेळी डॉ.गणेश ढवळे, सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती अध्यक्ष महावीर जाधव, दत्ता झोडगे यांची समयोचित मनोगत व्यक्त केले.मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र वाटप करून ओबीसी प्रवर्गातुन आरक्षण द्यावे तसेच या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी आंतरवली सराटी येथे सुरू केलेल्या आमरण उपोषणाचा आज ५ वा दिवस असुन त्यांची प्रकृती खालावली असल्याने समाजातुन तिव्र नाराजी असुन राज्य सरकारच्या संवेदनाहीन भुमिकेबद्दल संतापाची लाट उसळली आहे.मनोजजी जरांगे पाटील यांच्या शांततेत बंद पाळावा, कोणीही कायदा हातात घेऊ नये,कायद्या व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये याची दक्षता घेत ग्रामपंचायत कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषणास सुरुवात करण्यात आली आहे.आंदोलनास नेकनुर पोलिस स्टेशनचे एपीआय चंद्रकांत गोसावी, उपनिरीक्षक नितिन गुट्टुवार,आप्पासाहेब रोकडे,लिंबागणेश पोलिस चौकीचे संतोष राऊत, बाबासाहेब डोंगरे, गोविंद राख,विशाल क्षीरसागर यांनी भेट दिली.यावेळी आंदोलनात

## पोलीस चौकी तोडफोडीच्या खोट्या गुन्ह्यातील तरुणांना न्यायालयाकडून जामीन

**बीड । प्रतिनिधी**



मागील तीन महिन्यापूर्वी मराठा आरक्षण प्रश्नावर सर्वत्र आंदोलन चालू होते याच दरम्यान बीड शहरात अनेक ठिकाणी जाळपोळ व तोडफोड करण्यात आली होती. त्यानंतर मांजरसुंबा येथेही काही अज्ञात तरुणांनी मांजरसुंबा येथील महामार्ग पोलीस चौकी येथे दगडफेक करून तोडफोड केली होती या प्रकरणात अनेक तरुणावर गुन्हे दाखल करण्यात आले होते परंतु काही तरुण यात सहभागी नसतानाही त्यांच्यावर जाणीवपूर्वक ३०७ सारखे गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले होते या प्रकरणात त्या तरुणांना जवळपास तीन ते साडेतीन महिने घराच्या बाहेर राहावे लागले होते. काल या प्रकरणातील तरुणांना बीड जिल्हा व सत्र न्यायालयात कडून अंतरिम जामीन मिळाला. या प्रकरणात ऑड. बळवंत कदम, ऑड. नितीन रांजण व ऑड. नितीन शिंदे यांनी तरुणाची बाजू मांडली. जामीन मिळाल्यानंतर या प्रकरणातील ससेवाडी येथील तरुण नितीन कदम, मच्छिंद्र काळकुटे, सचिन कदम, बबलू काळकुटे यांच्यासह वैतागवाडी येथील तरुणांनी व मांजरसुंबा परिसरातील मराठा समाजाच्या वतीने ऑड. कदम,ऑड. रांजण व ऑड. शिंदे यांचे आभार मानले व त्यांचा जिल्हा न्यायालयात जाऊन सत्कार केला . याबाबत अधिक माहिती अशी की मराठा आरक्षण प्रश्नावर मागील तीन ते चार महिन्यापूर्वी बीड तालुक्यातील मांजरसुंबा या ठिकाणी काही अज्ञात लोकांकडून मांजरसुंबा महामार्ग पोलीस चौकीची तोडफोड करण्यात आली होती या प्रकरणात परिसरातील ससेवाडी, मांजरसुंबा, वैतागवाडी, सफेपुर, गवारी अशा अनेक गावातील तरुणावर पोलीस चौकी तोडफोडीत सहभागी नसतानाही ३०७ सारखे गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले होते या प्रकरणात अटकपूर्व जामीन करण्यासाठी मागील दोन महिन्यापूर्वी बीड येथील जिल्हा व सत्र न्यायालयात या तरुणांच्या जामीन मांडण्यात आल्या होत्या मागील अनेक दिवसापासून या प्रकरणात तारखेवर तारखी देण्यात येत होत्या आणि जामीन नाकारल्या जात होत्या परंतु काल या प्रकरणात या सर्व तरुणांना अंतरिम जामीन मंजूर करण्यात आला. या तरुणाच्या जामीन करण्यासाठी ऑड. बळवंत कदम,ऑड. नितीन शिंदे व ऑड. नितीन रांजवन यांनी तरुणांच्या बाजूने काम पाहिले व त्यांना जामीन मंजूर करून दिला त्यामुळे या तिघांचे मांजरसुंबा परिसरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

## सैनिक कल्याण विभागात पदांची भरती

**बीड । प्रतिनिधी**

सैनिक कल्याण विभाग व विभागाच्या अधिपत्याखालील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातील सरळ सेवेची पदे भरण्यासाठी कल्याण संघटक ४०, वसतिगृह अधीक्षक १७ कवायत प्रशिक्षक –०१ शारीरिक प्रशिक्षण निदेशक –०१ गट 'क' या पदाकरिता फक्त माजी सैनिक उमेदवाराकडून वस्तीगृह आदेशिका गट क ०३ या पदाकरीता भारताच्या सशस्त्र दलातील मृत सैनिकांच्या पत्नी आणि सशस्त्र दलातील मृत सैनिकांच्या पत्नी उपलब्ध होऊ शकत नसतील तर सेवा प्रवेश नियमाच्या अटीची पूर्तता करणाऱ्या माजी सैनिकांच्या पत्नी या उमेदवाराकडून ऑनलाइन पद्धतीने अर्ज मागविण्यात आले आहेत. वरील पदांपैकी ०१ पद हे अपंग सवर्गातून किमान ४० टक्के अपंगत्व असलेल्या उमेदवारांमधून दिव्यांगत्वाच्या प्रकारानुसार कर्तव्य व जबाबदारीचा विचार करून गुणवत्ता, उपलब्धतेनुसार भरण्यात येणार आहे. या भरती प्रक्रिया टीसीएस– आयओएन यांचे मार्फत होणार आहे. या परीक्षेसाठी अर्ज ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.पात्र उमेदवारांना वेब–बेस्ड (थशल –लरीशव) ऑनलाईन अर्ज www. mahasainik. maharashtra.gov.in ¶m संकेतस्थळावर ठशलींीळींपीं ढरलयेथे दिनांक १२ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ११.००वाजेपासून दि. ३ मार्च २०२४ रोजी ६.०० वाजेपर्यंत सादर करण्याचे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय यांनी केले आहे. त्यानंतर सदर वेब लिंक बंद होईल.

## शिवजयंतीच्या पार्श्वभूमीवर शांतता कमिटीची बैठक संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

१९ फेब्रुवारी रोजीच्या शिवजयंतीच्या पार्श्वभूमीवर आज दि.१५ गुरुवार रोजी सायंकाळी लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालय येथे नेकनुर पोलिस प्रशासनाच्या वतीने पोलिस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे यांच्या मार्गदर्शनात शांतता समिती सदस्य व सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती पदाधिकाऱ्यांची विशेष बैठक सरपंच बालासाहेब जाधव यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.यावेळी उपसरपंच बाळकृष्ण थोरात, पांडुरंग वाणी,शिवजयंती समितीचे अध्यक्ष महावीर वाणी, उपाध्यक्ष औदुंबर नाईकवाडे, तुकाराम गायकवाड, सचिव विक्रांत वाणी, अभिजित गायकवाड, दिनेश जाधव, विवेक बागल,खंडु वाणी,चेतन कानिटकर ,जिवन मुळे,कचरू निर्मळ, सुखदेव वाणी, दादा वाणी,चेतन कानिटकर, श्रीकांत शिंदे, आनंद बारगजे आदिंची उपस्थिती होती. नेकनुर पोलिस स्टेशनचे उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे यांनी शिवजयंती निमित्त कार्यक्रमांची माहिती घेत शांतता कमिटीच्या निमित्ताने मार्गदर्शनात शिवजयंती उत्सव साजरा करताना कायदा व सुव्यवस्था राखत आनंदोत्सव साजरा करावा.सांस्कृतिक, सामाजिक व प्रबोधनात्मक देखावे साजर करून छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र तरूण पिढीपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न करावा.पारंपारीक वाद्यांचा वापर करावा.वेळेचे पालन करावे.कुठल्याही समस्या असल्यास पोलिस प्रशासनाशी संपर्क करावा असा सुचना केल्या.यावेळी लिंबागणेश पोलिस चौकीचे पो.हे.संतोष राऊत, बाबासाहेब डोंगरे, रावसाहेब मुंडे, मधुकर तांदळे यांची उपस्थिती होती. सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

## हल्ल्याच्या निषेधार्थ महात्मा गांधी स्मारकासमोर आंदोलन

**बीड । प्रतिनिधी**

पुणे येथील राष्ट्र सेवा दल आणि विविध संघटनांच्या वतीने आयोजित सानेगुरुजी स्मारक येथे लढा लोकशाहीचा अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा या कार्यक्रमाला जात असताना निर्भय बनो अभियान प्रमुख पत्रकार निखिल वागळे,विधिज्ञ असीम सरोदे यांच्या गाडीवर करण्यात आलेला हल्ला हा लोकशाहीवर आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरील झुंडशाही आणि गुंडप्रवृत्तीच्या सत्ताधारी पक्षांच्या समर्थकांकडुन करण्यात आलेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ , दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी या मागणीसह निर्भय बनो अभियानाला पाठिंबा देण्यासाठी आज दि.१२ सोमवार रोजी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली छत्रपती संभाजी महाराज क्रिडा संकुल येथील महात्मा गांधी यांच्या स्मारकासमोर निर्भय बना सत्याग्रहआंदोलन करण्यात येऊन जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, प्रधान सचिव, गृहमंत्री यांना निवेदन देण्यात आले.यावेळी आंदोलनात शेख युनुस,सुदाम तांदळे,शेख मुबीन,शिवशर्मा शेलार, शेख मुस्ताक आदि सहभागी होते. निर्भय बनो अभियानचे प्रमुख पत्रकार निखिल वागळे, सामाजिक कार्यकर्ते विश्वंभर चौधरी,विधिज्ञ असीम सरोदे यांनी राज्यभरात सुरू केलेले अभियान त्यांच्या भाषणातुन आणि समाज माध्यमांवर टाकत असलेल्या पोष्ट वरून भाजप विरोधी असल्याचा आरोप करत पुणे येथील राष्ट्र सेवा दलाच्या वतीने आयोजित विविध संघटनांमार्फत लढा लोकशाहीचा, अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा या विषयावर सानेगुरुजी स्मारक याठिकाणी आयोजित कार्यक्रमाला जात असताना पत्रकार निखिल वागळे,विधिज्ञ असीम सरोदे यांच्या गाडीवर सत्ताधारी भाजपा समर्थकांनी भ्याड हल्ला करत गाडीच्या काचा फोडत, शाईफेक,अंडी फेक करत दहशत माजविण्याचा प्रयत्न केला.

## श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात विविध उपक्रम

**माजलगाव । प्रतिनिधी**

भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या, येथील श्री सिद्धेश्वर महाविद्यालया मध्ये दिनांक १६ रोजी सूर्यनमस्कार दिनाच्या निमित्ताने सामूहिक सूर्यनमस्कार स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. रथसप्तमीच्या निमित्ताने जागतिक सूर्यनमस्कार दिन, संपन्न होत असतो.या निमित्ताने महाविद्यालयाच्या क्रीडा विभागाच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन केले होते. महाविद्यालयातील या उपक्रमामध्ये अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.सूर्य मंडळाच्या रचनेमध्ये ही सूर्यनमस्कार स्पर्धा संपन्न झाली.यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर सुहास मोराळे,उपप्राचार्य डॉ. गजानना होन्ना,उपप्राचार्य प्रा.संतोष लिंबकर,उपप्राचार्य डॉ. युवराज मुळये या उपक्रमाचे संयोजक,क्रीडा विभाग प्रमुख डॉ.उमेश साडेगावकर,प्रा.दिनेश गडदे सह प्राध्यापकांची उपस्थिती होती

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, –४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड –४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com